अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना कायमपणाचे फायदे देण्याबाबत.

-29-

-17-

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक एसआरव्ही १०८०/१६/१३-अ.
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २० फेब्रुवारी १९८०.

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI
18 MAR 1980

पहा:- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७५/दहा, दिनांक १९ सप्टेंबर १९७५.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७५/दहा, दिनांक २ जानेवारी १९७६.
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७५/दहा, दिनांक २७ फेब्रुवारी १९७६.
(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७९/तेरा-अ, दिनांक २९ जून १९७९.

परिपत्रकः- दिनांक १९ सप्टेंबर १९७५ क्रमांक एसआरव्ही १०७५-दहा च्या शासन निर्णयाद्वारे काढलेल्या आदेशानुसार, जे अस्थायी कर्मचारी आदेशांतील अटींची पुर्तता करतील ते तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा केल्यावर आणि सक्षम अधिकाऱ्यांनी तसे प्रमाणपत्र दिल्यास संबंधित पदाच्या संदर्भात कायमपणाचे फायदे मिळण्यास पात्र ठरतात. हे फायदे ज्यांना मिळण्याचा हक्क आहे अशा प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याला ते प्रत्यक्षात लवकर मिळावेत अशी शासनाची ईच्छा आहे.

126
1648

२. संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे गोपनीय अभिलेख, अनेक कारणामुळे, सक्षम अधिकाऱ्यास तत्काळ पहाण्यासाठी उपलब्ध न होण्यामुळे त्यांना कायमपणाचे प्रमाणपत्र देण्यात उशिर होतो असे शासनाच्या निदर्शनास आले. म्हणून तिसऱ्या व चौथ्या वर्गातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, गोपनीय अभिलेख प्रत्यक्षात दाखल करण्याबाबत आग्रह न धरता, संबंधित शासकीय कर्मचारी जर कायमपणाचे फायदे मिळण्यास अन्यथा पात्र असेल व त्याचे अभिलेख चांगले असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे समाधान झाले असेल तर गोपनीय अभिलेख उपलब्ध होण्याची प्रतिक्षा न करता, त्याने स्वेच्छा निर्णयाने संबंधित कर्मचाऱ्याला कायमपणाच्या फायद्याबाबत प्रमाणपत्र द्यावे अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत.

३. अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना ते कायमपणाचे फायदे मिळण्यास पात्र झाले असताही दीर्घ कालावधीपर्यन्त काही सक्षम अधिकारी, त्यांच्याबाबतीत आवश्यक प्रमाणपत्र देत नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तरी सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना असे कळविण्यात येते की त्यांच्या नियंत्रणाखालील आस्थापनेवर असलेल्या अस्थायी कर्मचाऱ्यांच्याबाबतीत ते कायमपणाचे फायदे मिळण्यास पात्र होताच, त्यांना आवश्यक प्रमाणपत्र दिनांक ३० एप्रिल १९८० पर्यन्त द्यावे आणि त्याबद्दलची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकांत लगेच घेण्यात यावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना कायमपणाचे प्रमाणपत्र पूर्वीच देण्यात आले आहे अशाही कर्मचाऱ्यांच्याबाबतीत त्याबद्दलची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात अजूनपर्यन्त घेतली गेली नसल्यास लगेच घेण्यात यावी.

(कृ.मा.प.)

४. अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना कायमपणाचे फायदे देण्याबाबत वेळोवेळी किती प्रगती होत आहे हे समजण्यासाठी व्दैमासिक अहवाल सादर करण्यास मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आले होते. परंतु ते अहवाल त्या विभागांकडून वेळच्यावेळी आणि माहिती एकत्रित करून पाठविले जात नाहीत असेही शासनाच्या निदर्शनास आले आहे. आवश्यक माहितीच्या अभावी किती पात्र अस्थायी कर्मचाऱ्यांना कायमपणाचे फायदे मिळाले आहेत व किती जणांना ते मिळाले नाहीत याची कल्पना येत नाही. तरी सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्याकडून व्दैमासिक अहवाल वेळच्यावेळी उपलब्ध होतील याची दक्षता बाळगावी आणि त्यातील माहिती एकत्रित करून विहित विवरणपत्रामध्ये या विभागाकडे वर्षातून एकदा, जून महिन्याच्या अखेरीपर्यन्त, पाठवावी. एकत्रित माहिती मे ते एप्रिल या संपूर्ण एक वर्षाच्या कालावधीची असावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चं. वा. सराफ,
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

2-5-80

प्रति